क्र.का.प्रा.वि/आयसीडी/२०२२-२०२३/१८५

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.२/२०२२-२०२३

अधिसभा इतिवृत्त
दिनांक ८ सप्टेंबर, २०२२

अधिसभेची विशेष सभा गुरूवार दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता व्यवस्थापन परिषदेचे दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई -४०० ०९८ येथे आयोजित केली होती. सदर बैठकीत खालील मान्यवर उपस्थित होते :-

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास रघुनाथ पेडणेकर (कुलगुरू) | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | उपस्थित |
| ३. | प्रा. (डॉ.) राजेश श्रीकृष्ण खरात | उपस्थित |
| ४. | प्रा.(डॉ.) अनुराधा मजुमदार | उपस्थित |
| ५. | प्रा. (डॉ.) अजय मुरधीधर भामरे | उपस्थित |
| ६. | प्राचार्य (डॉ.) अनिता आनंद मोहन स्वामी | अनुपस्थित |
| ७. | डॉ. प्रसाद करंडे (प्रभारी संचालक, प. व मु. मं.) | उपस्थित |
| ८. | प्रा. (सीए.) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | उपस्थित |
| ९. | प्राचार्य (डॉ.) किशोर सुखटणकर | अनुपस्थित |
| १०. | डॉ. अद्वैत एम.वैद्य | अनुपस्थित |
| ११. | डॉ. समिर रमेश कुलकर्णी | अनुपस्थित |
| १२. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १३ | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| १४ | डॉ. नंदकिशोर रा. मोतेवार | **अनुपस्थित** |
| १५ | डॉ. सुनिल पाटील | **उपस्थित** |
| १६ | डॉ. मोहन नामदेव आमृळे | **उपस्थित** |
| १७ | श्री. शैलेंद्र देवळाणकर (प्र. कुलसचिव) | **उपस्थित** |

सभेची सुरूवात वंदे मातरम या गीताने झाली.

<u>श्रध्दांजली</u> :

प्रा. सुरेश नाखरे, श्री. सुधीर बेडेकर, श्री. नरेन परचुरे, श्री. के. शंकर नारायण, डॉ. माधव गोडबोले, श्रीमती. प्रेमा किरण, श्रीमती. रजनी परूळेकर, श्री. म. ना. गोगटे, पं. शिवकुमार शर्मा, श्री. रमेश लटके, श्रीमती. संजीवनी करंदीकर, श्री. एच. एम. दलवाई, डॉ. जी. एल. बदाम, श्री. कृष्णकुमार कुन्नथ, डॉ. श्रीनिवासाचारी राजप्पा, श्री. प्रदीप भिडे, डॉ. रामचंद्र दत्तात्रय लेले, श्री. पालनजी मिस्त्री, श्रीमती. विद्या केशव नार्वेकर, श्री. भूपेंद्र सिंह, श्री. अनंत ऊर्फ नंदा खरे, श्रीमती. सरस्वती पाटील, श्री. प्रदीप पटवर्धन, श्री. बाबूराव पाचर्णे, श्री. विनायक मेटे, श्री. राकेश झुनझुनवाला, श्री. प्रभाकर संत, श्री. अभिजित सेन, ॲड. सुखदेव काशीद, डॉ. एस. परशुरामन, श्री. सायरस मिस्त्री या सर्व महनिय व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थांसाठी अनमोल योगदान दिले आहे.

वरील सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्ल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. तद्नंतर नियमित कामकाजाला सुरूवात झाली.

<u>विकासात्मक वृत्तांत/काही उल्लेखनिय बाबी</u>

**बाब क्र.१ : दि. १५ व १६ मार्च, २०२२ रोजीच्या अधिसभेचे इतिवृत्त संमत करणे.**

**ठराव :** सभागृहामध्ये बाब क्र.१ दि. १५ व १६ मार्च, २०२२ रोजीच्या अधिसभेच्या इतिवृत्ताबाबत सविस्तर चर्चा झाली. अधिसभेचे इतिवृत्त बनविण्यासाठी ॲड. निल हेळकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने तयार केलेला इतिवृत्ताचा मसुदा अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. तद्नंतर

सर्वानुमते दि. १५ व १६ मार्च, २०२२ रोजीच्या अधिसभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**बाब क्र.२:** **विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (झ) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक बृहत आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत.**

**ठराव:** मा. अध्यक्षांच्या निर्देशानुसार कुलसचिवांनी "विद्यापीठाचा बृहत आराखडा" सभेच्या पटलावर मांडला. तसेच मा. प्र-कुलगुरू विद्यापीठाच्या बृहत आराखडयाचे सभागृहात सादरीकरण करतील असे घोषित केले. या सादरीकरणापूर्वी सभासदांनी आपले या आराखड्याच्या संदर्भात अवलंबलेल्या कार्य पध्दतीबाबत आपली मते मांडली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसारच हा आराखडा बनविला गेल्याचे मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहाला अवगत केले व हा आराखडा सभागृहापुढे मांडला. या आराखडयास प्रा. अजय भामरे यांनी अनुमोदन दिले.

या सर्व सदस्यांच्या मतप्रदर्शनानंतर मा. कुलगुरू यांनी चर्चेस अनुसरून संबोधन केले. विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा व भविष्यात केल्या जाणा-या उपाय योजनांचा आढावा घेतला. कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमाच्या भविष्यातील विस्तारीकरण व विद्यापीठाची त्या बाबतीत असणारी समज यांचाही त्यांनी आढावा घेतला. नवीन शैक्षणिक धोरण संदर्भात विद्यापीठ कार्यपध्दतीमध्ये कराव्या लागणा-या बदलांचाही भविष्यवेध त्यांनी घेतला व सभासदांना या आराखडयास मंजूर करावे अशी विनंती केली. आवाजी मतदानाने हा आराखडा मंजूर केला असे अध्यक्षांनी घोषित केले.

> "शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक बृहत आराखडयाचा मसुदा मा. प्र-कुलगुरू यांनी अधिसभेत सादर केला. त्यास प्रा. डॉ. अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३७ (झ) व कलम १०७ (५) नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्हयांमध्ये नवीन महाविद्यालयांस बिंदू उपलब्धतेच्या शिफारशी दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी

अधिष्ठाता मंडळाने केल्या. अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशी दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये बाब क्र. २ व तद्नंतर विद्वत परिषदेच्या बैठकीमध्ये बाब क्र. २.१ अन्वये सुधारीत शिफारशी केल्या. विद्वत परिषदेच्या शिफारशी दिनांक ८ सप्टेंबर, २०२२, रोजीच्या अधिसभेत ठेवण्यात आल्या व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिताची वार्षिक योजना अधिसभेच्या मंजुरीसह सुधारित परिशिष्ट 'अ' नुसार शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात आली. सोबत वार्षिक योजनेचे अधिसभेने मंजूर केलेले सुधारित 'परिशिष्ट- अ' जोडले आहे.

**बाब क्र. ३ : सन २०२०-२१ व २०२१-२०२२ या वर्षांचे वर्षवृत्ताचा मसुदा अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला.**

ठराव : सन २०२०-२१ व २०२१-२०२२ या वर्षांचे वर्षवृत्ताचा मसुदा अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता सदर बाब सर्व अधिसभा सदस्यांनी एकमताने मान्य केली.

बाब क्र.४ : Annual Accounts for the year 2016-2017,2017-2018, 2018-2019 & 2019-2020, Income & Expenditure Accounts and Balance Sheet as on 31st March 2017, 31st March 2018, 31st March 2019 and 31st March 2020 and Audit Report of 2016-2017, 2017-2018, 2018-2019 & 2019-2020 submitted by M/s. NBS & Co. Chartered Accountant & Statutory Auditor along with remark of the Finance & Accounts Committee be approved and be recommended to the Senate for their consideration and approval.

ठराव : It was resolved & confirm that Annual Accounts for the year 2016-2017, 2017-2018, 2018-2019 & 2019-2020 Income & Expenditure Accounts and Balance Sheet as on 31st March 2017, 31st March 2018, 31st March 2019 and 31st March, 2020 and Audit Report of 2016-2017, 2017-2018, 2018-2019 & 2019-2020 submitted by M/s. NBS & Co. Chartered Accountant & Statutory Auditor along with remark of the Finance & Accounts Committee by the Senate.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्ल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने कुलसचिवांनी जाहिर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

.............
कुलसचिव (प्र.)

.............
मा. कुलगुरू

.............
प्र-कुलगुरू